<u>राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक</u>

(पिनॅकल मॉल, ४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)

---

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**
**क्र. रामाआ-नाशिक/तक्रार क्र :११४/२०२२/अहमदनगर**

| तक्रारदार | प्रतिवादी |
|---|---|
| श्री. नारायण संपत नरवडे,<br>रा. कडूस, ता. पारनेर, जि. अहमदनगर. | ग्रामसेवक,<br>ग्रामपंचायत कार्यालय, कडूस,<br>ता. पारनेर, जि. अहमदनगर. |

**<u>सुनावणी दिनांक ३१/०१/२०२४</u>**

तक्रारदार यांनी दिनांक ३१/१२/२०२१ रोजीच्या अर्जान्वये राज्य माहिती आयोगाकडे तक्रार अर्ज दाखल केला आहे. त्यामध्ये दिनांक ३१/०१/२०२४ रोजी आयोजित सुनावणीसाठी विद्यमान जन माहिती अधिकारी व तत्कालीन जन माहिती अधिकारी उपस्थित असुन अन्य सर्व पक्षकार अनुपस्थित आहेत.

२) तक्रारदार यांनी दिनांक ३१/१२/२०२१ रोजीच्या तक्रार अर्जात नमुद केले आहे की,आयोगाच्या आदेशाप्रमाणे आजतागायत माहिती अदा केलेली नाही.

३) आयोगाने द्वितीय अपील क्रमांक. २१६०/२०१९/अहमदनगर वरील निर्णय दिनांक १२/०८/२०२१ अन्वये पुढीलप्रमाणे आदेश दिले आहेत. "विद्यमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, कडूस, ता. पारनेर, जि. अहमदनगर यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत अपिलार्थीस त्यांच्या दिनांक १४/०३/२०१९ रोजीच्या माहिती अर्जान्वये मागितलेल्या माहितीसंदर्भात नोंदणीकृत पोचदेय डाकेने पत्र पाठवूनउपलब्ध कागदपत्रांच्या समक्ष अवलोकनासाठी १५ दिवसांच्या आतील तारीख व वेळ कळवावी. अवलोकनानंतर अपिलार्थीस त्यातील कागदपत्रांच्या प्रती हव्या असल्यास तशी यादी माहिती विनामूल्य पुरवावी.

४) सुनावणीवेळी उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी असे नमूद केले की, आयोगाने द्वितीय अपील क्रमांक. २१६०/२०१९/अहमदनगर संदर्भात दि. १२/०८/२०२१ रोजी पारित केलेल्या आदेशानुसार तक्रारदारास यांना दि. ०१/०४/२०१९ अन्वये अपिलार्थीने शुल्क भरल्यानंतर माहिती दिली आहे. तसेच दि. २१/०६/२०१९ रोजी झालेल्या प्रथम अपिल निर्णयानंतर एकुण १९४ पानांची माहिती दिलेली आहे. माहिती दिलेली पोच देखील आयोगासमोर सादर केलेली आहे. तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दोन वेळा तक्रारदार यांना माहिती पुरविलेली आहे. त्यामुळे सदरची तक्रार पुढील चौकशी योग्य नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

प्रस्तुत तक्रार क्रमांक ११४/२०२२/अहमदनगर निकाली काढण्यात येत आहे.

(भुपेंद्र गुरव)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ नाशिक

जावक क्र अो-२४४८ 11 SEP 2024